# खंत

सारी इथे माणसंच, नाही कुणीच संत
अपूर्ण असल्याची का मग मना असावी खंत?
खंत म्हणजे अतृप्ती, कमतरतेची जाणीव
रात्रंदिवस धावून कशी भरून येते उणीव?
हवं ते सारं खरंच मिळत असतं का?
मिळालंच एक तरी दुस-यासाठी
मन झुरत नसतं का?
केंव्हाच म्हटलय समर्थांनी. सर्वसुखी कुणीच नाही
मिळेल तेवढंच आपलं. हीच समाधानाची ग्वाही
समाधानी असणं सोपं नक्कीच नाही. पण----
जमलं जर एकदा, आनंदच सर्व ठायी
जीवाचा केला आटापीटा, नशीबापेक्षा जास्त मिळेना
भटकणा-या मनाला, केंव्हा समजावं कळेना
मागणं एकच ईश्वरा, समाधान लाभो अनंत
शांत रहावं मन, सोडून सारी खंत -----

सौ. गौरी मंदार गानू.